# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक २४/११/२०१६

## सकाळी ११.३० वा.

| अ. क्र. | विषयाचे नाव | मा. स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | विषय क्र. १) मागील मा. स्थायी समिती सभा दि. ११/११/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | **ठराव :-** मागील मा. स्थायी समिती सभा दि. ११/११/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. पंकज पाटील** |
| २ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५७ अन्वये एकूण ३० नियम आणि कलम ४५८ अन्वये ४७ उपविधी तयार करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत. | **ठराव** :- वसई-विरार शहर महानगरपालिकेची स्थापना ३ जुलै, २००९ रोजी झाली असून अधिनियमातील तरतुदीनुसार कामकाज सुरळीतपणे चालविणेकरीता, कलम ४५७ अन्वये नियम, व कलम ४५८ अन्वये उपविधी उपलब्ध असणे अत्यावश्यक आहे. सदर नियम/उपविधी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था या शिखर संस्थेकडून तयार करुन घेण्यांत येणार आहेत. नियम/उपविधीसाठी रू.२६,६०,०००/- (रू. सव्वीस लाख, साठ हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. संस्थेच्या मागणीनुसार अपेक्षित एकूण खर्चाच्या ५०% म्हणजे रू. १३,३०,०००/- (रु. तेरा लाख, तीस हजार मात्र) इतकी रक्कम अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेस आगाऊ अदा करण्यास तसेच नियम व उपविधी तयार करण्यासाठी येणाऱ्या एकूण खर्चास ही स्थायी सभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अजीत नाईक सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील** |
| ३ | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या रूग्णालयात वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी मानद तत्वावर दंत चिकित्सक डॉक्टर नियुक्त करणेबाबतच्या प्राप्त अर्जावर निर्णय होणेबाबत. | **ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या रूग्णालयात वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी मानद तत्वावर दंत चिकित्सक डॉक्टर नियुक्त करणेबाबतच्या प्राप्त अर्जावर निर्णय होणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, महानगरपालिकेच्या विजयनगर, तुळींज रूग्णालयात नव्याने सुरु करण्यांत येणाऱ्या दंत चिकित्सा विभागासाठी मानद तत्वावर दंत चिकित्सक डॉक्टर उपलब्ध झाल्यास रूग्णांना फायदा होणार असल्याने याकामी डॉ. सिध्दीका शेख, बी.डी.एस., डॉ. भक्ती पिंपळे, बी.डी.एस, डॉ. ऋषिकेश टिल्लू, बी.डी.एस, व डॉ. शौकत अली अन्सारी, बी.डी.एस यांना महानगरपालिकेने निश्चित केलेनुसार दरमहा रू. २,५००/- इतके मानधन व त्यांनी केलेल्या कामाची होणारी फी महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दरानुसार अदा करून त्यांना नियुक्त करणेस ही सभा मंजूरी देत असून याकामी येणाऱ्या संपुर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील** |

| | | |
|---|---|---|
| | | |
| ४ | प्रभाग समिती 'एफ' पेल्हार क्षेत्रातील वालईपाडा येथे समाज मंदिर बांधणे (मा.आ.श्री.क्षितीजजी ठाकूर ह्यांच्या फंडाअंतर्गत सन २०१५-१६) कामी कमी दराच्या निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव** :- उपरोक्त निविदाची तुलना करात मे. तुषार शशिकांत मांडवकर यांची निविदा (अंदाजपत्रकापेक्षा ०.०५%) कमी दराने सर्वात कमी व वाजवी आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळण्याकरीता तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त ह्यांनी मंजूरी दिली आहे. याकामी म.न.पा.तर्फे कायदेशीर बाबींची पुर्तता करून संविदा करण्यासाठी ही सभा मान्यता देत आहे. याकामी येणाऱ्या खर्चास अंतिम व प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री.वृंदेश पाटील** |
| ५ | वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील कार्यक्षेत्रात रस्त्यावरील खड्डे बुजविणे, डागडुजी करणे (बी-२ निविदा) कामी कमी दराच्या निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव** :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे.मॅनदिप एन्टरप्रायझेस ह्यांची निविदा (पुन:श्च वाटाघाटीने) सर्वात कमी वाजवी आहेत. सदर कमी दराची निविदा मंजूरीस्तव सादर. दि. १८/०६/२०१६ रोजी झालेल्या प्रिबिड मिटींग चर्चेमध्ये ठरल्याप्रमाणे १ वर्षाकरीता निविदा दर मंजूर करण्यांत यावेत असा निर्णय झाला होता. तसेच सदर मंजूर दराने निविदेमध्ये सहभाग घेतलेले अन्य निविदाधारक काम करणेस इच्छुक असल्यास त्यांनाही पॅनलवर नियुक्त करण्यात येईल व त्यांच्याकडूनही काम करून घेणे इष्ट होईल. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त ह्यांनी मंजूरी दिली आहे. याकामी म.न.पा.तर्फे कायदेशीर बाबींची पुर्तता करून संविदा करणेसाठी ही सभा मान्यता देत आहे व याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. मे. मॅनदिप एंटरप्रायजेस ह्यांचे कडून सर्व प्रभागातील अत्यंत तातडीची पॅचवर्कची कामे करून घेण्यांत यावीत व सर्व प्रभागांमध्ये इतर कामे करण्यासाठी अन्य ठेकेदारांचे पॅनल करणेसाठी पुनश्च: निविदा कारवाई स्वतंत्रपणे करणेंत यावी असा निर्णय ही सभा घेत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अजीत नाईक सूचक :- मा.श्री. समीर डबरे** |
| ६ | सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विहीरींची साफसफाई करणे कामी प्राप्त निविदेच्या दरास मान्यता देवून संविदा करणेस मान्यता **मिळणेबाबत.** | **ठराव** :- उपरोक्त विषयी सविस्तर चर्चा होऊन असे ठरविण्यांत आले की, सदर कामी मे.टी.ए.कोनार यांनी अ.क्र. १ ते अनुक्रमांक १८ चे दर वाटाघाटीने कमी करून दिले असून सदर कमी करून दिलेल्या दरांना मान्यता देण्यांत येत असून त्यांच्याशी कामाची संविदा करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर कामी मंजूर निविदा दरानुसार येणाऱ्या एकूण वार्षिक खर्चास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. अजीत नाईक** |

| | | |
|---|---|---|
| ७ | सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागा अंतर्गत येणाऱ्या क्षेत्रातील महापालिकेच्या मालकीच्या बोअरवेल आवश्यक साहित्यासह देखभाल दुरुस्ती करणेकामी प्राप्त निविदेच्या दरास मान्यता देवुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत. | **ठराव** :- उपरोक्त विषयी सविस्तर चर्चा होऊन असे ठरविण्यांत आले की, सदर कामी कामी मे.शिवगंगा बोअरवेल यांनी बाब क्र. १, २ ४ व ५ चे दर तसेच बाब क. ३ चे दर मे. शार्प एंटरप्रायजेस यांनी वाटाघाटीने कमी करुन दिले असून सदर कामी कमी करुन दिलेल्या दरांना मान्यता देण्यांत येत आहे. निविदेत सहभाग घेतलेले सर्व पात्र ठेकेदार यांनी कमी केलेल्या (अ.क्र. १ ते ५) दरानुसार काम करण्यांस इच्छुक असल्यास त्यांच्याकडून संमत्तीपत्र घेवून करारनामा करुन त्यांची पॅनलवर नियुक्ती करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. सदर कामी ठेकेदाराची पॅनलवर नियुक्ती होईपर्यंत मागील वर्षाच्या मंजूर ठेक्यास मुदतवाढ व खर्चास मान्यता देण्यांत येत आहे. सदर कामी मंजूर निविदा दरानुसार येणाऱ्या एकूण वार्षिकखर्चास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. अजीत नाईक** |
| ८ | वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती डी वॉर्ड क्र. ५७ मध्ये एल.बी.टी. कार्यालयात प्राथमिक आरोग्य केंद्रास पार्टीशन करणे कामी कमी दराच्या निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव** :- उपरोक्त निविदाची तुलना करता मे . स्वप्नील शेठ यांची निविदा (अंदाजपत्रकापेक्षा १.६०% कमी दराने) सर्वात कमी व वाजवी आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळण्याकरीता तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त ह्यांनी मंजूरी दिली आहे. या कामी म.न.पा.तर्फे कायदेशीर बाबींची पुर्तता करून संविदा करण्यासाठी ही सभा मान्यता देत आहे. याकामी येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. अजीत नाईक** |
| ९ | प्रभाग समिती डी, आचोळे क्षेत्रातील वर्धमान नगर येथे ज्येष्ठ नागरीकांसाठी सामाजिक सभागृह बांधणे (मा.आ.श्री.क्षितीजजी ठाकूर यांच्या फंडाअंतर्गत (सन २०१५-१६)) कामी कमी दराच्या निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव :-** सदर बाबत सांगोपन चर्चा होवून उपरोक्त निविदांची तुलना करता मे. अंश एंटरप्रायजेस ह्यांची निविदा सर्वात कमी व वाजवी आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त ह्यांनी मंजूरी दिली आहे. याकामी संविदा करणेसाठी ही सभा म.न.पा.च्या वतीने सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करून मान्यता देत आहे व याकामी येणाऱ्या खर्चास प्रशाकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. अजीत नाईक** |
| १० | प्रभाग समिती डी, आचोळे क्षेत्रातील वर्धमान नगर येथे उद्यान विकसीत करणे (मा.आ.श्री.क्षितीजजी ठाकूर यांच्या | **ठराव :-** सदर बाबत सांगोपन चर्चा होवून उपरोक्त निविदांची तुलना करता मे. बाबा कन्स्ट्रक्शन ह्यांची निविदा सर्वात कमी व वाजवी आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त ह्यांनी मंजूरी दिली आहे. याकामी संविदा करणेसाठी ही सभा म.न.पा.च्या वतीने |

| | | |
|---|---|---|
| | फंडाअंतर्गत (सन २०१५-१६)) कामी कमी दराच्या निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करुन मान्यता देत आहे व याकामी येणाऱ्या खर्चास प्रशाकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. अजीत नाईक** |
| ११ | वसई विरार शहर महानगरपालिका व वसई विकासीनी संचालित वसई विकासीनी दृककला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १३ वी प्रत्यक्ष राज्यस्तरीय निसर्ग चित्रण स्पर्धेसाठी आर्थिक सहकार्य मिळणेबाबत. | **ठराव** :- वसई विरार शहर महानगरपालिका व वसई विकासीनी संचालित वसई विकासीनी दृककला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १० डिसेंबर २०१६ रोजी मध्ये वसई विरार पुर्व-पश्चिम विभागातील शाळेतील १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी बालचित्रकला स्पर्धा २०१६ आणि १३ वी प्रत्यक्ष राज्यस्तरीय, निसर्गचित्रण स्पर्धा, वाळूशिल्प स्पर्धा आणि प्रत्यक्ष व्यक्तिचित्रण स्पर्धा सन २०१७ मध्ये आयोजित करणेकामी आजची ही सभा सर्वानुमते आर्थिक मंजूरी देत आहे. तसेच सदरचे कार्यक्रम यशस्वीरीत्या राबविणेकामी रू. ४,००,०००/- इतके अनुदान वसई विकासनी यांचे नावे धनादेशाद्वारे/RTGS द्वारे अदा करणेकामी आजची ही सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. अजीत नाईक** |
| | | |